# सुज्ञांसाठी श्रीगुरुमाईंचे हितोपदेश

*शनिवार, २८ नोव्हेंबर, २०२०*

प्रत्येक शब्द महत्त्वाचा असतो.
का?
एका शब्दात एका मंत्राची शक्ती असू शकते,
जी तिच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी उद्धारक असते.
एका शब्दात एका शापाची शक्ती असू शकते,
जी तिचा स्वीकार करणाऱ्यांसाठी विनाशकारी असते.
एक शब्द मनुष्याला त्या ज्ञानापर्यंत घेऊन जाऊ शकतो, जे त्याला मुक्त करेल.
एक शब्द मनुष्याला नैराश्याच्या गर्तेत लोटून देऊ शकतो
आणि त्याला त्याच्या स्वतःच्याच आशाहीन अवस्थेमध्ये जखडून ठेवू शकतो.
आश्वासनाचा एक शब्द त्यांना पंख देतो
जे स्वतःच्या जीवनात महान गोष्टी साध्य करण्याची आकांक्षा बाळगतात.
आक्रोशाचा एक शब्द त्यांच्या महत्त्वाकांक्षांना
छिन्नविछिन्न करून टाकतो ज्यांनी स्थायी भविष्य बनवण्यात
स्वतःचे सर्वस्व पणाला लावलेले असते.

आपल्या शब्दाच्या शक्तीवर चिंतन करा
आणि यावरही की तुम्ही स्वतःच्या अस्तित्वातून त्या शब्दाला
बाहेर ब्रह्मांडात कसे जाऊ देता.

इतरांच्या शब्दांच्या शक्तीचा तुमच्या अस्तित्वावर जो प्रभाव पडतो
त्यावर चिंतन करा.
ते सदाशयतेच्या सुवर्ण-खाणीपर्यंत पोहोचतात
की ते दुराशयतेच्या तळहीन गर्तेला अनावृत करतात?

हे समजून घ्या की, जी गोष्ट दुरुस्त होण्यापलीकडची आहे,
त्या गोष्टीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करणे
निरर्थक आहे.

हे समजून घ्या की, तुमचे स्वतःचे असे भाग्य आहे
जे त्याच्या स्वतःच्या अद्वितीय सौंदर्याने आणि सुगंधाने
बहरलेच पाहिजे.

ते सोडून द्या जे तुम्हाला तुमच्या प्रतिज्ञांचा
सन्मान करण्याच्या अधिकारापासून आणि
तुमच्या संकल्पांची पूर्तता करण्यापासून वंचित ठेवते.

ते सोडून द्या जे आत्म्याच्या प्रशांतीच्या दिशेने होणाऱ्या
तुमच्या यात्रेत बाधा आणते.

प्रत्येक दशकाचे, प्रत्येक शतकाचे, प्रत्येक युगाचे
स्वतःचे असे गुण आणि दोष असतात.
त्यामध्ये स्वतःचेच असे मिश्रण असते,
सत्शीलतेचे आणि दुष्टपणाचे,
उत्कृष्टतेचे आणि अधमतेचे, नैतिकतेचे आणि भ्रष्टतेचे,
स्थायित्वाचे आणि भंगुरतेचे, सन्मानाचे आणि अवमानाचे,
फायद्यांचे आणि तोट्यांचे, लाभांचे आणि उणीवांचे,
स्वातंत्र्यांचे आणि अडथळ्यांचे, परोपकाराचे आणि स्वार्थीपणाचे,
आरोग्यसंपन्नतेचे आणि व्याधींचे, संरक्षणांचे आणि संकटांचे,
सकारात्मक आणि नकारात्मक पैलूंचे, वरदानांचे आणि विघ्नांचे,
रक्षक-तारक गुणांचे आणि आडकाठ्यांचे.
मनुष्याच्या मनामध्ये,
म्हणजेच त्या जगतात,
ज्याला मनुष्य या सुंदर नीलग्रहावर आणि संपूर्ण ब्रह्मांडावर लादत असतो,
ही द्वंद्वे भरपूर आहेत.

एकीकडे जर कोणी स्वतःच्या हृदयात पसरलेल्या मिट्ट अंधकाराचा बचाव करत असेल
आणि दुसरीकडे मंदिरात दिवा लावत असेल,
तर त्याचा काय उपयोग?
तो असे कोणासाठी करतो आहे?

तेव्हा, चोवीस तास, अखंडितपणे,
आत-बाहेर प्रवाहित होणाऱ्या,
आपल्या श्वासोच्छ्वासाचा आधार घेऊन
या आंतरिक प्रक्रियेवर चिंतन करा.

स्वतःच्या कमांडरशी, परम आत्म्याशी संबंध न तोडता,
चोवीस तास तुमच्या सेवेत तत्पर राहणाऱ्या
तुमच्या विशुद्ध मनाचे आवाहन करून,
या आंतरिक यात्रेवर चिंतन करा.

विचार करा, की काय शक्य आहे.
विचार करा, की काय करता येईल.
विचार करा त्या जीवनाविषयी जे तुम्ही जगू इच्छिता.
विचार करा, तुम्ही कशा प्रकारे स्वतःचे ज्ञान वाटू शकता.
विचार करा, कशा प्रकारे तुम्ही आज, उद्या आणि परवा
शिळेप्रमाणे भक्कम बनून राहू शकता.

तुमच्या विचारप्रक्रियेचा आराखडा जेव्हा तयार केला जातो आहे, तेव्हा त्याबरोबरच
त्या गोष्टी कार्यान्वित करायला सुरुवात करा ज्या तुम्ही आत्ता करू शकता.
तुमच्या जगताची मांडणी अशा प्रकारे करा
की जेणेकरून तुम्ही प्रत्येक क्षणी, प्रत्येक तासाला,
प्रत्येक दिवशी, आठवड्यात, महिन्यात, आणि वर्षी
हृदयाची दिव्यता अनुभवू शकाल.

ज्ञानाच्या आणि वैराग्याच्या भिंगांचा उपयोग करून,
आपले विचार आणि आपली कर्मे यांचा ताळमेळ साधत राहा.

सिद्धयोग साधना म्हणजे हे समजून घेणे
की, सर्व गोष्टी त्यांच्या खऱ्या सत्त्वाने चमकाव्यात
यासाठी तुम्ही जे भरपूर प्रयत्न करता,
त्यांचा उदय भाररहित प्रयासहीनतेतून होऊ शकतो आणि व्हायलाही हवा.

©२०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.